# पावसाळ्यात मेट्रो ३ करणार २०,९०० वृक्षांची लागवड

■ मुंबई, प्रतिनिधी

**मुंबई** मेट्रो ३ आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी खासदार पूनम महाजन यांच्या हस्ते वृक्षारोपण अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. मातंगगड जवळ मालाड येथे मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे, मुख्य वनसंरक्षक अन्वर अहमद तसेच मेट्रो ३ चे आणि वन विभागाचे अधिकारी सहभागी झाले. या उपक्रमाअंतर्गत मुंबई मेट्रो ३ आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांच्यात झालेल्या करारानुसार या पावसाळ्यात २०,९०० वृक्षांची लागवड करण्यात येणार असून पुढील ७ वर्ष वृक्षांची देखभाल करण्यात येणार आहे. वृक्ष प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार मेट्रो ३१०,४५० वृक्षांची लागवड करणार असून, उर्वरित वृक्षांची लागवड ही मेट्रो ३ च्या सामाजिक जाणिवेतून सीएसआर उपक्रमांतर्गत करण्यात येणार आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाने निर्धारित केलेल्या १९ हेक्टर जमिनीचा वापर एमएमआरसी या उपक्रमासाठी करणार आहे. यावेळी भिडे यांनी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे वनसंरक्षक अन्वर अहमद यांचे आभार मानले. तसेच हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि मेट्रो ३ ची टीम या प्रकल्पावर लक्ष ठेवणार आहे.